# विशेष पोलीस वार्तापत्र

दिनांक 27/02/2018

---

दि. 25/02/2018 रोजी मृतक अनिल ऊर्फ लहाण्या भिमराव गजभिये याचा चिंतामणी नगर बोदड येथे त्याचे अंगावर पैशाचे व प्लॉटचे कारणावरुन मिरची पावडर टाकुन त्यास धारदार शस्त्राने जबर मारहान करेनु त्यास जिवा निशी ठार करण्यात आले अशा फिर्यादी सौ.ममता अनिल गजभिये,वय 32 वर्ष ,रा. अशोक नगर ,लोहारा.यवतमाळ यांचे रिपोर्टवरुन पो.स्टे. लोहारा येथे अप क्र. 38/2018 क. 302,34 भादंवि. चा नोंद करण्यत आला.

दि. 27/02/2018 रोजी सदर खुनाचे गुन्हयातील आरोपींचा शोध घेत असतांना टोळी विरोधी पथकातील पोउपनि.संतोष मनवर व त्यांचे पथकातील कर्मचारी यांना गोपनिय बातमीदारांकडुन खात्रीशीर बातमी मिळाली की, मृतक अनिल ऊर्फ लहाण्या भिमराव गजभिये याचा खुन करणारी महीला आरोपी नामे कुंदा कुमरे ही तिचे आईचे घरी नेताजी नगर येथे लपुन आहे. त्यावरुन पोउपनिञसंतोष मनवर व त्यांचे पथकातील कर्मचारी व महीला कर्मचारी यांचे सह नेताजी नगर येथे जिजाबाई कुमरे हीचे घरी जावुन आरोपी कुंदा कुमरे हिला ताब्यात घेवुन विचारपुस केली असता सदर गुन्हयासंबधाने तिचे सोबतीला आणखी कोण-कोण आहे याबाबत विचारपुस केली असता तिने व तिचा जावाई नामे 2)पवन कैलास राऊत,वय 22 वर्ष,रा.दिग्रस ह.मु.महाजनवाडी हिंगणा,नागपुर 3) सिध्दार्थ रेवनाथ बन्सोड रा.पाटीपुरा यांचे मदतीने दि. 24/02/2018 रोजी खुन केल्याचे कबुल केले वरुन पो.स्टॉफ सह नागपुर येथे जावुन सापळा रचुन तेथुन आरोपी नामे 2)पवन कैलास राऊत,वय 22 वर्ष,रा.दिग्रस ह.मु.महाजनवाडी हिंगणा,नागपुर 3) सिध्दार्थ रेवनाथ बन्सोड रा.पाटीपुरा यांना ताब्यात घेवुन यवतमाळ येथे आले. व तिनही आरोपींनो विचारपुस केली असता सदरचा गुन्हा त्यांनीच कटे रचुन केला असल्याची कबुली दिल्याने महीला आरोपी 1) नामे कुंदा कुमरे, 2)पवन कैलास राऊत,वय 22 वर्ष,रा.दिग्रस ह.मु.महाजनवाडी हिंगणा,नागपुर 3) सिध्दार्थ रेवनाथ बन्सोड रा.पाटीपुरा यांना ताब्यात घेवुन सदरचा गुन्हा उघडकीस आणुन गुन्हयातील तिनही आरोपीतांना गुन्हयाचे पुढील तपास कामी पो.स्टे.लोहारा यांचे ताब्यात देण्यात आले.

सदरची कामगीरी मा. श्री.एम. राज कुमार,पोलीस अधीक्षक,यवतमाळ , मा.श्री.अमरसिंह जाधव,अपर पोलीस अधीक्षक,यवतमाळ, श्री.पियुष जगताप,उपविभागीय पोलीस अधीकारी यवतमाळ यांचे मार्गदर्शनाखाली श्री. मुकुंद कुलकर्णी पोलीस निरीक्षक, स्था.गु.शा. यवतमाळ पोउपनि/संतोष मनवर, सफौ/ऋषी ठाकुर, पोहवा/संजय दुबे, पोना/किरण पडघण,विनोद राठोड,किरणे श्रीरामे,अमोल चौधरी,पोशि/जयंत शेंडे,राजु कांबळे,मपोशि/प्रियंका ढोके,मिनाक्षी जंगले,वैशाली मेंढे, ड्रापोहवा/योगेश गटलेवार, गणेश देवतळे, सर्व टोळी विरोधी पथक ,स्था.गु.शा. यवतमाळ यांनी पार पाडली.

पोलीस अधीक्षक यवतमाळ

करिता.